ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख ३० जुलै, १९५८ अंक ११

## विविध माहिती

**इराकमधील तेलाचा पुरवठा**—इराक सरकारच्या अमेरिकेंतील वकिलातीतर्फे असें जाहीर करण्यांत आलें आहे कीं इराकचें नवें सरकार तेलाचें उत्पादन व त्याची विक्री पूर्वीप्रमाणेंच चालू ठेवणार आहे. तेलाच्या विहिरी, नळ व इतर संबंधित गोष्टी सुरक्षित रहाण्यासाठी जरूर ती खबरदारी घेण्यांत येत आहे.

**रंगून शहराचा पाणीपुरवठा**—रंगूनच्या कॉर्पोरेशननें अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय-सहकार-व्यवस्था मंडळाशीं एक करार केला आहे. कराराप्रमाणें संस्थेतर्फे कॉर्पोरेशनला १४,००,००० डॉलर्सचें कर्ज मिळणार आहे. कर्जाचा उपयोग रंगून शहराचा पाणीपुरवठा व सांडपाण्याचीं गटारें ह्यांची सुधारणा करण्यासाठी होणार आहे.

**नागपूर शहराला दुधाचा पुरवठा**—नागपूर शहराच्या नागरिकांना दूध-पुरवठा करण्याची एक योजना लवकरच अंमलांत आणण्यांत येणार आहे. सरकारी शेतकी कॉलेजच्या पशु विभागाकडून व खाजगी धंदेवाइकांकडून रोज ४० मण दूध जमविण्यांत येणार आहे. एका वर्षाच्या अवधींत सुमारें १०० मणापर्यंत दूध रोज गोळा करून त्याचें वांटप केलें जाईल.

**महारोग्यांची वसाहत**—औरंगाबादपासून दोन मैलांवर महारोग्यांची एक वसाहत स्थापन करण्यांत आली आहे. वसाहतीसाठी १२,००० रुपये खर्च झाला आहे. वसाहतीचें उद्घाटन करतांना आचार्य विनोबा भावे ह्यांनीं महारोग्यासंबंधीं एक तपशीलवार पहाणी करण्यांत यावी, अशी सूचना केली.

**क्ष-किरण चित्रासाठी फिल्म्स**—क्ष-किरणाच्या साह्यानें घेण्यांत येणाऱ्या वैद्यकीय चित्रासाठी लागणारी फिल्म आयात करण्याचे परवाने चालू सहामाहीसाठी देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. फिल्मची आयात करणाऱ्या नेहमींच्या व्यापाऱ्यांनीं ९ ऑगस्ट, १९५८ पूर्वी परवान्यासाठी अर्ज करावयाचे आहेत.

**रबराच्या किंमती वाढल्या**—मध्यपूर्वेतील युद्धाच्या वातावरणामुळें सिंगापूरच्या रबर बाजारांत रबराच्या किंमती वाढूं लागल्या आहेत. चालू वर्षांतील किंमतींनीं नुकताच उच्चांक गांठला आहे. रबराप्रमाणें टिनच्या किंमतीहि वाढल्या आहेत.

**पाकिस्तानच्या दंडेलीचा परिणाम**—आसाम व पूर्व-पाकिस्तान ह्यांच्या सरहद्दीवर पाकिस्तानकडून जे हल्ले मधून मधून करण्यांत येत आहेत, त्यामुळें भारतीय सरहद्दीच्या अलीकडील १,५०,००० लोकांच्या जीवनावर वाईट परिणाम झाला आहे. त्यांना आपले नेहमींचे व्यवसाय करतां येत नसल्यामुळें त्यांची आर्थिक कुचंबणा चालू आहे. बहुतेक लोक सीमेवरील खेड्यांतील आहेत.

**माथेरानला पाण्याचें दुर्भिक्ष**—उन्हाळ्याच्या सुटींत माथेरानला जाणाऱ्या व तेथें रहाणाऱ्या लोकांना पाण्याचा फार तुटवडा पडतो. पाणी पुरवठा करणाऱ्या 'शारलट लेक' तळ्याचा विस्तार करण्यांत येणार आहे अशी वार्ता होती. पण म्युनिसिपालिटीनें कर वाढवूनहि पाण्याची सोय केलेली नाहीं, अशा तक्रारी करण्यांत येत आहेत.

**मद्रासच्या हातरुमालांची निर्यात**—पश्चिम आफ्रिकेंत मद्रासचे हातरुमाल लोकप्रिय करण्याच्या उद्देशानें त्या भागांत एक दुकान उघडण्यांत येणार आहे. हातरुमालांच्या निर्यातीमुळें भारताला १·२ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळूं शकेल असा अंदाज आहे. ऑल इंडिआ हँडलूम फॅब्रिक्स मार्केटिंग सोसायटीनें हा उपक्रम करण्याचें ठरविलें आहे.

**दिल्लींतील पुराच्या त्रासाचें कारण**—दिल्ली शहरांत नुकत्याच झालेल्या बेसुमार पर्जन्यवृष्टीनें तेथील महत्त्वाच्या सरकारी कचेऱ्यांत व टेलिफोन एक्सचेंजच्या इमारतींतहि पाणी शिरलें होतें. दिल्लींतील सांडपाण्याच्या गटारांची व मोऱ्यांची व्यवस्था चांगली नसल्यानें पुराचा त्रास झाला, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**सुरत म्युनिसिपालिटीचा निर्णय**—सुरत म्युनिसिपालिटीनें शहरांतील घरांच्या वार्षिक भाड्याच्या आधारावर मालमत्ता कर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. ह्यापूर्वी मालमत्तेची किंमत करण्यांत येऊन त्याच्या आधारानें म्युनिसिपालिटी आपला कर बसवीत असे. कराबाबतचे नवे नियम तयार करण्यांत आल्यावर कराची आकारणी करण्यांत येईल.

**दामोदर-खोरे योजनेसाठी कर्ज**—दामोदर-खोरे योजनेच्या विस्ताराच्या चालू योजनेचा परदेशीय हुंडणावळींतील खर्च भागविण्यासाठी जागतिक बँकेनें २·५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाची मुदत २० वर्षांची असून व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा पांच पूर्णांक तीन अष्टमांश असा आहे. भारताची परदेशीय चलनाची अडचण लक्षांत घेऊन कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे.

**१४,००० घरांची बांधणी**—१९५६ सालीं बंगालमध्यें आलेल्या पुरांत ज्या खेडुतांचीं घरें पडलीं त्यांना आपलीं घरें बांधण्यासाठी सरकार मदत करीत आहे. सरकार त्यांना पैसे व माल पुरवीत आहे. श्रम मात्र ज्याचे त्यानें करावयाचे आहेत. ह्या योजनेप्रमाणें सध्या १४,००० घरें बांधण्यांत येत आहेत. ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारकडून मदतीची अपेक्षा करण्यांत येत आहे.

## शॉर्ट टर्म व कॉलमनी ह्यांचे व्याजाचे दर

### सेंट्रल बँक ऑफ इंडिआचा पुढाकार

१९५७ हें वर्ष बँकांना चांगलें गेलें आतां ठेवी वाढल्या असून कर्जांची मागणी मंदावली आहे. त्यामुळें ठेवी–कर्जांचें प्रमाण समाधानकारक झालें आहे आयातीवरील निर्बंधामुळें औद्योगिक वाढीला आळा बसला आहे. शेतीचें उत्पादनहि फारसें सुधारत नाहीं. आर्थिक व्यवहारांना तेजी नसतांना बँकांची ठेवीसाठी स्पर्धा चालूच आहे! बँकांच्या अध्यक्षांनीं वार्षिक सभांच्यावेळीं ह्यासंबंधांत विचार व्यक्त केले. ते सर्व स्पर्धा थांबविण्याचा सल्ला देणारेच होते. भारी दरानें ठेवी घेऊन त्या गुंतविण्यास पुरेसा वाव नाहीं आणि शॉर्ट टर्म ठेवी मात्र वाढत आहेत. ह्यांतून मार्ग काढण्याचे कामीं सेंट्रल बँक ऑफ इंडिआनें पुढाकार घेऊन शॉर्ट टर्म डिपॉझिटवरील व्याजाचा दर ४½% चा एकदम ३½% वर उतरविला, कॉलमनीवरील व्याजाचा दर ४% चा ३¾% केला आणि नवीन कॉलमनी स्वीकारण्याचें बंद केलें. बँकेच्या सर्व शाखांना त्याप्रमाणें कळविण्यांत येऊन, दरांत उतार तात्काळ अंमलांत आणण्यांत आला. हिंदी बँकांजवळील शिलकी पैसा वाढत चालला आहे, त्याला ह्यामुळें आळा बसेल; निदान बँकांवरील व्याजाचा बोजा तरी कमी होईल व कर्जदारांनाहि कमी दरानें कर्जें मिळूं शकतील कारण, सेंट्रल बँकेच्या पाठोपाठ इतर बँकाहि आपला ठेवींवरील व्याजाचा दर उतरविण्याचा प्रयत्न करतीलच. कर्जें देण्यासाठी अनिष्ट स्पर्धा करण्यापेक्षा ठेवी स्वस्तांत मिळविणें श्रेयस्कर ठरेल, हें उघड आहे. बँकांनीं ह्या बाबतींत सहकार्यानें निर्णय घेण्यांचे आजपर्यंतचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले आहेत, ही पार्श्वभूमि लक्षांत घेणें येथें आवश्यक आहे.

---

### कुटुंबनियोजनाबाबत बदलत चाललेली वृत्ति

जगांतील लोकसंख्येचा फार मोठा भाग आशिआ खंडांत आहे त्याचप्रमाणें आशिआ खंडांतील लोकसंख्येच्या वाढीचा वेगहि बराच आहे. पश्चिम युरोपमधील औद्योगिक उत्पादन व्यवस्था जसजशी आशिआ खंडांत रुजत चालली आहे, तसतशी लोकसंख्येच्या वाढीबद्दलची वृत्तीहि हळु हळु बदलत चालली आहे. पूर्वी कुटुंबनियोजनाला अथवा संततिप्रतिबंधाला फार जोराचा विरोध होत असे. विरोधाचीं कारणें धार्मिक स्वरूपाचीं असतात. शिवाय कुटुंबनियोजन हें अनैसर्गिक आहे अशीहि समजूत दृढ झालेली होती. परंतु अलीकडे अन्नधान्याची व इतर जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई व लोकसंख्येची बेसुमार वाढ ह्यामधील उघड दिसणाऱ्या विरोधानें लोकांची वृत्ति बदलूं लागली आहे. कुटुंबनियोजन हें स्वास्थ्य वा समाधान ह्यांच्यासाठी आवश्यक आहे, ही गोष्ट ग्रामीण भागांतील लोकांना सुद्धां पटूं लागली आहे. भारतानें तर कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ४७.९ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कार्यक्रमाप्रमाणें शहरांतून ५०० कुटुंबनियोजन केंद्रें व ग्रामीण भागांतून २,००० केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांतून जोडप्यांना सल्ला देण्यांत येईल. चीनची लोकसंख्या ५८ कोटींच्या घरांत आहे व ती झपाट्यानें वाढत आहे. म्हणून चीनच्या सरकारनेंहि कुटुंबनियोजनाचा प्रचार मोठ्या प्रमाणावर चालविला आहे. जपानमध्येंहि कुटुंबनियोजनाच्या कार्याला सरकारनें जोराचा पाठिंबा दिलेला आहे. सीलोनमध्यें कुटुंबनियोजनविषयक एक प्रायोगिक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. बौद्ध भिक्षूंचा ह्या बाबतींतील विरोध लक्षांत घेऊन सरकार जरा आस्ते कदम चालत आहे.

---

### ट्रेझरी बिलांच्या विक्रीस पुनः प्रारंभ

सुमारें २८ महिन्यांच्या खंडानंतर, रिझर्व्ह बँकेनें ट्रेझरी बिलांची सार्वजनिक विक्री पुनः सुरू केली आहे. ९१ दिवसांच्या मुदतीचीं १ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें विक्रीस काढून त्यांसाठी टेंडर्स मागविण्यांत आलीं. २९ जुलै रोजीं सकाळीं ११ चे आंत टेंडर्स पाठविण्याचीं होतीं. डिसेंबर, १९४९ पर्यंत ट्रेझरी बिलांचे पद्धतीनें सरकार वारंवार पैसे उभारीत असे. कांहीं प्रमुख बँकाच मुख्यतः त्यांत पैसे गुंतवीत असत. २० डिसेंबर, १९४९ ते ९ सप्टेंबर, १९५२ पर्यंत ही विक्री बंद ठेवण्यांत आली होती, ती चालू करून पुनः २० एप्रिल १९५४ ते २ नोव्हेंबर १९५४ ह्या मुदतींत बंद ठेवली गेली. ३ एप्रिल १९५६ रोजीं ती पुनः बंद करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आतां ती प्रथमच सुरू होत आहे. ट्रेझरी बिलें म्हणजे सरकारच्या साध्या प्रॉमिसरी नोटा होत; त्यांत गुंतविलेले पैसे फेडण्यासाठी नवीन ट्रेझरी बिलें काढून नवे पैसे स्वीकारले जातात. ट्रेझरी बिलांत बँकांनीं पैसे गुंतविणें त्यांनाहि सोईचें असतें. कारण त्यांची मुदत अत्यल्प असते आणि शिलकी पैशावर सोइस्कर दरानें व्याज मिळतें सरकारी खजिन्यांतील शिलका पुरेशा राखण्यास ट्रेझरी बिलांच्या विक्रीनें मदत होते.

## इनकमटॅक्सची आकारणी—उत्पन्नाची छाननी

(आंकडे कोटी रुपयांचें)

| | १९५५–५६ | | | | १९५६–५७ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पन्न | एकूणशीं % | कर | एकूणशीं % | उत्पन्न | एकूणशीं % | कर | एकूणशीं % |
| पगार | २०६.४६ | २५.९९ | २२.१५ | १०.६८ | २०७.३६ | २१.९३ | २२.७५ | ८.८९ |
| रोख्यांवरील व्याज | १०.२१ | १.२९ | ४.५४ | २.१८ | १३.५८ | १.४४ | ६.४१ | २.५० |
| मालमत्ता | २९.६९ | ३.७४ | ६.११ | २.९५ | ३३.७९ | ३.५७ | ७.१३ | २.७८ |
| धंदा व व्यवसाय | ४५२.११ | ५६.९२ | १३७.९६ | ६६.५१ | ५७४.७४ | ६०.७८ | १७३.७० | ६७.८४ |
| डिव्हिडंड | ४५.९७ | ५.७९ | १९.२६ | ९.२८ | ५५.२१ | ५.८४ | २४.५५ | ९.५९ |
| इतर उत्पन्न | ४९.८७ | ६.२८ | १७.४५ | ८.४१ | ६०.९० | ६.४४ | २१.५२ | ८.४० |
| एकूण | ७९४.३२ | १०० | २०७.४५ | १०० | ९४५.५८ | १०० | २५६.०६ | १०० |

# अर्थ

बुधवार, ता. ३० जुलै, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नपदार्थ टिकविण्याच्या धंद्याचें महत्त्व

भारतामधील विविध प्रकारच्या हवामानांत निरनिराळ्या ऋतूंत अनेक प्रकारचीं फळें व भाजीपाला विपुलतेनें उत्पन्न करण्यांत येतात. फळांच्या अगर भाजीपाल्याच्या हंगामांत त्या त्या पदार्थांची रेलचेल उडून जाते. पण, नंतर मात्र त्यांची दुर्मिळता जाणवूं लागते. आहारांत फळें व भाजीपाला ह्यांचें स्वतंत्र महत्त्व तर आहेच. पण, त्याशिवाय ज्या मानानें ह्या पदार्थांचा भोजनांत अधिक उपयोग होऊं लागेल, त्या मानानें अन्नधान्याची बचतहि होऊं शकते. सध्यांच्या अन्नधान्याच्या टंचाईच्या दिवसांत हीहि बाब दुर्लक्ष करण्यासारखी नाहीं. हंगामांत फळांच्या व भाजीपाल्याच्या उत्पादनापैकी २० ते ४० टक्के उत्पादन नासधुशीच्या भक्ष्यस्थानी पडते असा अंदाज करण्यांत आलेला आहे. हेच पदार्थ जर डबाबंद पद्धतीनें टिकविण्याची व गैर-हंगामांत बाजारांत आणण्याची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर झाली तर तें फार उपयुक्त ठरणार आहे. भारतांत असे कांहीं कारखाने आहेत. तथापि, डबाबंद अन्नपदार्थ ताज्या पदार्थांपेक्षा कमी पोषक असतात अशी एक समजूत आहे. पण ती वाटते तितकी खरी नाहीं. शिवाय, बाजारांत तरी खरा ताजा माल मिळतोच असें नाहीं. तेव्हां डबाबंद अन्नपदार्थ वापरण्याची प्रवृत्ति अधिक वाढली तर एक महत्त्वाचा धंदा फोफावेल आणि लोकांच्या आहारांत अधिक वैचित्र्य येऊन त्यांचें पोषणहि सुधारेल. लोणचीं, निरनिराळ्या प्रकारचे मोरंबे, चटण्या, फळें, भाजीपाला इत्यादि अनेक अन्नपदार्थ डबाबंद पद्धतीनें टिकवितां येण्यासारखे आहेत. त्यांच्या किंमती जर सामान्य माणसाच्या खरेदी शक्तीच्या आवाक्यांत ठेवल्या, तर त्यांची देशांतील बाजारपेठहि वाढीस लागेल.

ह्या दृष्टीनें डेव्हलपमेंट कौन्सिल फॉर फूड प्रोसेसिंग इंडस्ट्रीज ह्या संघटनेची स्थापना स्वागतार्ह आहे. अन्नपदार्थ टिकविण्याचा धंदा आपली प्रगति हळुहळु करीत आहे. १९५५ सालीं ह्या धंद्यानें ३२ कोटी रुपयांचा माल तयार केला होता. १९५७सालीं ४८ कोटी रुपयांचा माल तयार करण्यांत आला. डेव्हलपमेंट कौन्सिलनें ह्या धंद्याला उत्तेजन देऊन १९६०-६१ अखेर त्यांच्या उत्पादनांत १५० टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. म्हैसूर येथील सेंट्रल फुड टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट ह्या धंद्याला शास्त्रीय संशोधनाची मदत करीत आहे. देशांतील बाजारपेठांचा विस्तार करण्याबरोबरच परदेशीय बाजारपेठेंत माल पाठविण्याचाहि प्रयत्न करण्यांत येणार आहे. धंद्याच्या उत्पादनांत ठरविल्याप्रमाणें वाढ झाली तर ११,००० टन माल परदेशी पाठवितां येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्यां सुमारें १,७०० टन मालच निर्यात केला जातो. निर्यात वाढविण्याच्या कामीं कांहीं अडचणी आहेत. त्यांचा निरास करण्यांत आला तरच संकल्पित निर्यात शक्य होणार आहे. एक तर परदेशीय बाजारपेठांत माल खपेल अशा किंमती ठेवण्यांत आल्या पाहिजेत; शिवाय मालाचा दर्जा चांगला राखून तो सुरक्षित पॅकिंगमध्यें पाठविण्यांत आला पाहिजे. उदाहरणार्थ भारतामधील आंब्याची चटणी ह्या मालानें अमेरिकेंत व इंग्लंडमध्यें आपला जम बरा बसविला होता. पण अलीकडे तेथील कारखानदार कैऱ्यांच्या चकत्याच मागवूं लागले आहेत व त्यावरील पुढील संस्कार ते स्वतांच करूं लागले आहेत. किंमतीच्या दृष्टीनें व दर्जा राखण्याच्या दृष्टीनें असें करणें त्यांना जरूर वाटूं लागलें आहे. ह्या व इतर बाबींचा संबंधित कारखानदारांनीं नीट विचार करणें अगत्याचें आहे.

## अभ्रकाच्या पुरवठ्याची मक्तेदारी उरली नाहीं

भारताचा औद्योगिक विकास साधण्यासाठी आणखी कांहीं वर्षे तरी परदेशांतून भांडवली मालाची आयात करावी लागेल. ही आयात आवश्यक असून तीसाठीं भारतामधून कच्चा माल निर्यात करावा लागतो. अभ्रक, मिरीं, लाख, इत्यादि कांहीं पदार्थ असे आहेत कीं, त्यांच्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय चलन मिळूं शकतें. पण मिरी, लाख व अभ्रक ह्यांच्या पुरवठ्याच्या बाबतींत आतां भारताची मक्तेदारी राहिलेली नाहीं. मिऱ्याची लागवड आतां इंडोनेशियांत अधिक शास्त्रीय पद्धतीनें करण्यांत येत आहे. अभ्रकाच्या बाबतींतहि अशीच स्थिति आहे. अभ्रक व लाख ह्यांचा विजेच्या उपकरणांत विशेष उपयोग करण्यांत येतो. दक्षिण आफ्रिका व ऱ्होडेशिआ ह्या देशांत कमी प्रतीचें अभ्रक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सांपडतें. अमेरिकेंतहि कमी प्रतीच्या अभ्रकाचें उत्पादन बरेंच होतें. टँगानिका येथें उत्तम प्रतीचें अभ्रक मिळूं शकतें. गेल्या कांहीं वर्षांत ब्रिटन टँगानिकाकडून अभ्रक विकत घेत आहे. भारतांत बिहार व आंध्र ह्या राज्यांत अभ्रकाचें उत्पादन होतें. त्यामुळें अभ्रकाच्या किंमतीवर ह्या धंद्यांतील मजुरांचें भवितव्य अवलंबून असतें. बिहारमध्यें अभ्रकाचा धंदा कुटिरोद्योगाच्या पद्धतीवर करण्यांत येत असतो. अभ्रकाच्या किंमती स्थिर राखणें आवश्यक होऊन बसलें आहे. भारत अमेरिकेला चांगल्या प्रतीचें अभ्रक निर्यात करतो. पण, अलीकडे, ह्या वस्तूच्या पुरवठ्याबाबत भारताला ब्राझिल ह्या देशाकडून स्पर्धा होऊं लागली आहे. खुद्द भारतांत अभ्रकाचा खप उत्पादनापेक्षा बराच कमी असल्यामुळें अभ्रकाच्या किंमती स्थिर करण्यासाठीं निर्यातीचाच मार्ग शिल्लक रहातो. धंद्यांतील बेकारी निर्यातीनेंच नाहींशी होईल.

## भारतामध्यें वापरांत असलेल्या सायकली

| वर्ष | हिंदी उत्पादन | आयात | एकूण |
|---|---|---|---|
| १९५१ | १,१०,००० | १,६६,००० | २,७६,००० |
| १९५२ | १,९०,००० | २,८३,००० | ४,७३,००० |
| १९५७ | ८,००,००० | १,५६,००० | ९,५६,००० |

# बँकांतील चालक–नोकर सलोख्याचें महत्त्व

## लहान उद्योगधंद्यांना भांडवल पुरवठा

### श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांचें उद्‌बोधक भाषण

[ रिझर्व्ह बँकेचे निवृत्त गव्हर्नर व भारत सरकारचे पूर्वीचे अर्थमंत्रि श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ला नुकतीच भेट दिली. त्यावेळीं बँकेचे संचालक व स्टाफ ह्यांना उद्देशून त्यांनीं जें भाषण केलें, तें "अर्थ"मध्यें प्रसिद्ध करण्यास त्यांनीं खास अनुमति दिली आहे. त्याबद्दल आम्हीं श्री. देशमुख ह्यांचे आभारी आहों. ]

"मी रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर होतों त्यावेळीं आणि नंतर अर्थमंत्री असतांना माझेवर एक बंधन घालून घेतलें होतें, आणि तें म्हणजे कोणत्याहि व्यापारी बँकेस् भेट द्यावयाची नाहीं. ह्या बँकेला भेट देण्याचें ऋण त्यामुळें तसेंच त्यावेळीं राहून गेलें; आतां मात्र मी आपलें निमंत्रण स्वीकारलें आहे.

#### ओलाव्याचीं स्थानें

"नोकरवर्गाची नोकरीबाबत परिस्थिति आणि लहान उद्योगधंद्यांना भांडवल पुरवठा, ह्या दोन बाबी मला जिव्हाळयाच्या वाटत असत. बऱ्याच महिन्यांच्या अवधीनंतर, आतां नोकरवर्गाच्या वेतनाचा प्रश्न सर्वांनाच समाधानकारक वाटेल अशा रीतीनें सुटला आहे. निदान, मुख्य तत्त्वें घालून देण्यांत आलीं असून तीं संबंधित सर्व जणांनीं मान्य केलेलीं दिसून येतात. तरीसुद्धां, रहाणीच्या खर्चातील वाढीचा प्रश्न गेल्या कांहीं महिन्यांत उपस्थित झाला होता. बँका एका वर्गातून दुसऱ्या वर्गात गेल्यामुळेंहि अडचणी निर्माण होतात. बँक ऑफ महाराष्ट्र ज्या कल्पनेनें चालविण्यांत येत आहे व ज्या जाणीवेनें तिचा नोकरवर्ग काम करीत आहे, त्याची मला माहिती असल्याकारणानें, कितीहि बिकट प्रश्न आले तरी आवश्यक ती देवाण–घेवाण केली जाईल ह्याबद्दल मला शंका वाटत नाहीं. इतर मोठ्या बँकांच्या रांकेंतच महाराष्ट्र बँक असूनहि, बँकेचे चालक व नोकर ह्यांचे परस्पर–संबंध नेहेमींच सलोख्याचे राहिले आहेत, असें श्री. जोग ह्यांचेकडून मला समजलें, तेव्हां मला अतिशय आनंद झाला. ह्या वाढत्या, वालुकामय प्रदेशांतहि ओलाव्याचीं स्थानें असतात, हें माझ्या लक्षांत आहे.

"काम करणाराची उत्पादनक्षमता, हा खरा विचाराचा प्रश्न आहे आणि त्यावर नोकराचा कामाकडे पहाण्याचा दृष्टिकोन कसा आहे, ह्याचा फार मोठा परिणाम होत असतो. आपल्या लोकांना बुद्धि कमी आहे, असें मुळींच नाहीं; त्यांना आवश्यक तें शिक्षण व प्रवीणताहि पण आहे.

#### महाराष्ट्र बँकेविषयीं अपेक्षा व प्रगति

"ही बँक म्हणजे एक प्रकारचा मार्गदर्शक दीप आहे; तिच्या क्षेत्रापुरताच नाहीं तर व्यापक क्षेत्रासहि तो उपयोगी आहे. १९४९ मध्यें मी रिझर्व्ह बँक सोडली, तेव्हां महाराष्ट्र बँकेकडे २ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या; आतां त्या ८ कोटी रुपयांचेवर गेल्या आहेत. आठ वर्षांत शाखांची संख्या १७ ची ४२ झाली आहे. ह्या बँकेचे हितचिंतक बँकेनें ज्याप्रकारें प्रगति करावी अशी अपेक्षा करतात, त्याप्रकारें तिनें प्रगति केली आहे, ही एक समाधानाची बाब आहे. चालक व नोकर ह्यांचेमध्यें पूर्णपणें एकोपा नसता, तर ही प्रगति शक्य झाली नसती, हें मी पुन्हां एकवार सांगू इच्छितों.

"व्यापारी उपक्रमांत आणखी एक, तिसरा अप्रत्यक्ष भागीदार असतो आणि तो म्हणजे जनता. ह्या भागीदारालाहि विसरतां कामा नये, असें माझें नेहमीं सांगणें असतें.

"मला जी माहिती देण्यांत आली आहे त्यावरून पाहिलें, तर ह्या संस्थेबद्दल महाराष्ट्रांतील लोकांना बराच अभिमान आहे, असें मला वाटतें. बँकेचें जनतेशींहि नातें सलोख्याचें आहे.

"पुष्कळ बाबतींत महाराष्ट्र बँकेचें धोरण बऱ्याच सावधगिरीचें आहे, असें आढळतें. ह्यापुढें होणाऱ्या घटनांकडेहि जागरूकतेनें लक्ष द्यावें लागेल. कोणत्याहि बँकेनें केवळ शाखा वाढवीत राहूं नये; नाहींतर नफा मुळींच न दाखविणाऱ्या शाखा बऱ्याच व्हावयाच्या. केवळ प्रतिष्ठेसाठीं कोणत्याच बँकेनें शाखा काढूं नयेत.

#### व्यक्तिगत संबंधांची जरूरी

"लहान प्रमाणावर उद्योगधंदा करणाऱ्यांच्या खऱ्या अडचणींचें आकलन जेवढें व्हावयास पाहिजे, तेवढें झालेलें नाहीं आणि स्थानिक जनता व उद्योगधंदे ह्यांच्या नात्याविषयींहि आस्थेवाइक चौकशी होत नाहीं. म्हणून, लहान ठिकाणीं बँकांच्या शाखा उघडल्या जाव्यात, अशी माझी तीव्र इच्छा होती; त्या ठिकाणीं बँकांना पुरेसा वावहि मिळूं शकतो. बँकेचा व तिच्या गिऱ्हाइकाचा व्यक्तिगत संबंध असणें अत्यंत महत्त्वाचें असतें. ज्या मानानें बँक मोठी, त्या मानानें दैनंदिन व्यवहारांतील व्यक्तिगत संबंध कमी, असें घडून येतें. मोठ्या बँकेच्या असंख्य शाखांपैकी एक शाखा, एवढेंच त्या शाखेचें स्थान रहातें; बँक आणि गिऱ्हाईक ह्यांच्यांतील व्यक्तिगत संबंध संपुष्टांत येतो.

"आपल्या महाराष्ट्रीय लोकांजवळ भांडवल नाहीं. लहान उद्योगधंद्यांना मदत करणाऱ्या चांगल्या, व्यवस्थित संस्थांना मदत करण्याचें कांहींतरी लवचिक साधन आपल्याहातीं असणें त्यामुळें विशेष महत्त्वाचें ठरतें. लहान उद्योगधंदा असणाराजवळ तारण देण्याजोगा माल नसतो. परंतु, किरकोळ धंदेवाल्यालाहि योग्य तें कर्ज मिळूं शकेल अशी कांहींतरी योजना काढली पाहिजे.

#### लहान असामींना भांडवल पुरविण्याचा प्रश्न

"लहान उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्यासाठीं आपण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २०० कोटी रु. ची तरतूद केली आहे. मुदत फार थोडी व हातीं रकम फार मोठी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून पसरलेल्या माणसांना काम मिळवून देण्यासाठीं लहानसहान उद्योगांचा विस्तार कसा करतां येईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. लहानसहान उद्योगधंद्यांच्या द्वाराच देशाच्या अंतर्गत भागास वाजवी महत्त्व प्राप्त होईल. ह्या मार्गांतून माणसें पुढें येतील, त्यासाठीं लहान धंद्यांची खूपच वाढ होणें जरूरीचें आहे. विजेच्या प्रसारामुळें उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण होईल आणि लहान असामींना भांडवल पुरविण्याचा प्रश्न लागलीच उपस्थित होईल. ह्यासंबंधांत महाराष्ट्र बँकेला आपला योग्य तो वांटा उचलावा लागेल."

# उद्योगधंद्यांचा किफायतशीरपणा कमी झाला

## भांडवल वाढलें, विक्री वाढली, पण नफ्याचें प्रमाण उतरलें

### (२२७ निवडक कंपन्यांचा आढावा)

ज्या पब्लिक लिमिटेड कंपन्यांचे हिशेब मार्च, १९५७ अखेरच्या तिमाहींत पुरे करण्यांत आले, अशा प्रमुख २२७ कंपन्यांच्या ताळेबंदांचा विचार केला तर असें दिसून येतें कीं, त्यापूर्वीच्या वर्षांच्या मानानें भांडवलांत वाढ झाली असली, तरी नफ्याचें प्रमाण उतरलें आहे. धंद्यांतील वाढीस बँकांकडून घेतलेल्या कर्जांचा विशेष उपयोग झाला. विक्रीचें उत्पन्न बरेंच वाढलें, तसा उत्पादनखर्चहि वाढला.

विक्रीचें उत्पन्न १९५५ मध्यें ४१८ रु. झालें होतें, तें १९५६ मध्यें ४६४ रु. वर गेलें. म्हणजे, त्यांत ११·१% वाढ झाली. त्या प्रमाणांत उत्पादनखर्चहि वाढला परंतु मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना मात्र वाढला नाहीं; तो ४·२ कोटी रु. वरून २·९ कोटी रु. वर उतरला. म्हणजे, त्यांत १·३ कोटी रु. ची घट झाली. कंपन्यांनीं १९५५ मध्यें १३·८ कोटी रु. घसारा काढला होता; १९५६ मध्यें त्याची रक्कम १४·९ कोटी रु. भरली.

कराची तरतूद करण्यापूर्वीचा नफा ११·५% नें कमी झाला. १९५५ मध्यें तो नफा ४५·१ कोटी रु. होता, तो १९५६ मध्यें ४०·४ कोटी रु. झाला. कपास, ताग, लोखंड–पोलाद व कागद ह्यांच्या कारखान्यांच्या नफ्यांतील मोठ्या घटीचा तो परिणाम आहे. कंपन्यांनीं १९५६ मध्यें नफ्याचा निम्मा भाग करासाठी राखून ठेवला; १९५५ मध्यें फक्त ४०·६% भाग त्याला पुरला. ह्यामुळें, करांची तरतूद केल्यानंतर उरलेला नफा २५·५% नें घटला. त्याचा परिणाम मुख्यतः फंडांकडे कमी रक्कम वर्ग करण्यांत झाला. डिव्हिडंडची रक्कम जवळ जवळ कायमच राहिली.

(१) ठोक नफ्याचें विक्रीशीं प्रमाण, आणि (२) ठोक नफ्याचें गुंतविलेल्या एकूण भांडवलाशीं प्रमाण, ह्या दोन प्रमाणांच्या दृष्टीनें पाहिलें तर कंपन्यांचा किफायतशीरपणा निश्चित कमी झाला आहे. पहिलें प्रमाण १२·५% चें १०·३% झालें असून दुसरें प्रमाण ११·४% चें ८·८% झालें आहे.

कंपन्यांचें एकूण भांडवल व देणीं ह्यांची रक्कम ४६२ कोटी रु. वरून ५४४ कोटी रु. झाली; म्हणजे ती १७·९% नें वाढली. ह्या ८२·६ कोटी रुपयांच्या वाढींत कर्जाच्या रकमेचा वांटा मोठा, जवळ जवळ निम्मा, आहे. त्या ४०·२ कोटी रुपयांपैकीं बँकांचे कर्जांची रक्कम बरीच मोठी, म्हणजे एकूण वाढलेल्या देण्यांच्या ३४·५% आहे.

जिंदगीच्या बाजूपैकीं सर्व बाबींत वाढ दिसून आली; सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणूक, बँकांतील शिल्लक व कचेरींतील शिल्लक ह्यांत मात्र घट झाली. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १·८ कोटी रुपयांनीं कमी झाली.


# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २९ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के

होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, | सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, | एक कोटी, चौदा लाखांचेवर |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन. एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

## २२७ निवडक पब्लिक लिमिटेड कंपन्यांचे एकत्रित हिशेब

### उत्पन्न, खर्च व नफ्याची वांटणी

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | १९५५ | १९५६ |
|---|---|---|
| खर्च, तरतुदी व वांटणी | | |
| १. प्रारंभींचा स्टॉक ( पक्का माल व यंत्रांवरील माल ) | ४१,०७ | ४४,२८ |
| २. वापरलेला कच्चा माल व उत्पादनाचा इतर खर्च | २३६,४३ | २७७,९५ |
| ३. पगार व मजुरी | ६४,८१ | ७२,२५ |
| ४. कामगारांचा वेल्फेअर फंड | ५,५६ | ६,७३ |
| ५. बुडीत कर्जें | ७ | ३१ |
| ६. एक्साईज ड्यूटी | १४,९१ | १७,२८ |
| ७. व्याज | ३,१४ | ४,९९ |
| ८. मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना | ४,१७ | २,८९ |
| ९. इतर खर्च | ३८,४५ | ४४,११ |
| १०. घसाऱ्याची तरतूद | १३,७५ | १४,८८ |
| ११. करापूर्वीचा नफा | ४५,१४ | ३९,९५ |
| १२. करांची तरतूद | १८,३४ | १९,९८ |
| १३. करानंतरचा नफा | २६,८० | १९,९७ |
| ( अ ) डिव्हिडंडची रक्कम | १२,२८ | ११,४९ |
| ( ब ) न वांटलेला नफा | १४,५० | ८,४८ |
| १४. एकूण | ४६७,५० | ५२५,६२ |
| उत्पन्न | | |
| १५. विक्री/मुख्य उत्पन्न | ४१८,३५ | ४६४,६३ |
| १६. इतर उत्पन्न | ५,३१ | ६,४३ |
| १७. अखेरीचा स्टॉक ( पक्का माल व यंत्रांवरील माल ) | ४३,८४ | ५४,५६ |
| १८. एकूण | ४६७,५० | ५२५,६२ |

### स्त्री बँक मॅनेजर

बार्कलेज बँकेनें आपल्या हॅनोव्हर स्क्वेअर ( लंडन ) येथील नव्या शाखेच्या मॅनेजरचे जागीं मिस हार्डिंगची योजना केली आहे. ब्रिटिश बड्या बँकांपैकी कोणींहि ह्यापूर्वी कोणत्याहि स्त्रीला अशा जागीं नेमलेलें नाहीं. बार्कलेज बँकेचे जनरल मॅनेजर मि. थॉर्टन ह्यांची मिस हार्डिंग ही कित्येक वर्षे सेक्रेटरी होती. तिनें १९३४ मध्यें बँकेंत शॉर्टहँड टायपिस्ट म्हणून वार्षिक ५० पौंड वेतनावर प्रवेश केला. १९४७ सालीं, जनरल मॅनेजरची सेक्रेटरी होण्यापूर्वी, तिला विंबल्डन येथील बँकेच्या ट्रेनिंग स्कूलमध्यें पाठविण्यांत आलें होतें व नंतर ती हेनले येथील ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेजांतहि दाखल झाली होती. त्या जागीं पुरुषाची नेमणूक झाली असती तर त्याला जितका पगार मिळाला असतां, तितका मिस हार्डिंगला मिळणार आहे. तिचें वय ४२ वर्षांचें आहे.

## २२७ कंपन्यांचा एकत्रित ताळेबंद

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | १९५५ | १९५६ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | १५२,५५ | १६४,३५ |
| १. ऑर्डिनरी | ११७,६६ | १२७,०४ |
| २. प्रेफरन्स | ३४,८९ | ३७,३१ |
| फ्री रिझर्व्ह व सरप्लस | ९६,२० | ११०,०२ |
| ३. कॅपिटल रिझर्व्ह | १५,२० | १८,६६ |
| ४. जनरल व इतर रिझर्व्ह | ८१,०० | ९१,३६ |
| ५. टॅक्सेशन रिझर्व्ह | ३३,२४ | ३४,०८ |
| कर्जें | ९७,४२ | १३७,५९ |
| ६. बँका | ३४,७४ | ६३,२८ |
| ७. इं. फि. कॉर्पोरेशन | ३,०२ | २,९५ |
| ८. इतर गहाणखतें | २०,१८ | २८,८० |
| ९. डिबेंचर्स | १३,८० | १२,४१ |
| १० इतर | २५,६८ | ३०,१५ |
| ११. व्यापारी व चालू देणीं | ७८,४० | ९४,१६ |
| १२. इतर बिगर चालू देणीं | ४,२४ | ४,५४ |
| १३. एकूण | ४६२,०५ | ५४४,७४ |
| ठोक फिक्स्ड असेट्स | ३०५,९५ | ३६६,२८ |
| १४. जमीन | १२,७९ | १३,५१ |
| १५. इमारती | ७१,०४ | ७९,४६ |
| १६. यंत्रसामुग्री | २००,३२ | २४६,९२ |
| १७. इतर | २१,८० | २६,३९ |
| १८. वजा घसारा | १३७,४९ | १४८,९३ |
| १९. निव्वळ फिक्स्ड असेट्स | १६८,४६ | २१७,३५ |
| स्टॉक्स व स्टोअर्स | ११७,९० | १४८,०९ |
| २०. कच्चा माल | ४५,५० | ५६,२३ |
| २१. तयार माल, यंत्रांवरील माल | ४३,८४ | ५४,५६ |
| २२. इतर | २८,५६ | ३७,३० |
| येणीं | ७३,३९ | ८४,७७ |
| २३. कर्जें | १९,७८ | १८,७३ |
| २४. व्यापारी येणीं | ५३,६१ | ६६,०४ |
| इन्व्हेस्टमेंट्स | ३६,७० | ३५,०६ |
| २५. सरकारी रोखे | ८,३६ | ६,६१ |
| २६. निमसरकारी रोखे | २ | २ |
| २७. औद्योगिक रोखे | १७,६० | १७,६१ |
| २८. सबसिडिअरी कंपन्यांचे भाग | १०,७२ | १०,८२ |
| २९. आगाऊ भरलेला प्राप्ति कर | २१,६७ | २१,३३ |
| इतर जिंदगी | १०,०३ | १०,२९ |
| ३०. स्थावर मिळकत | ६५ | ७२ |
| ३१. किरकोळ | २,३४ | २,६६ |
| ३२. अदृश्य जिंदगी | ७,०४ | ६,९१ |
| कॅश, बँकांतील शिलका | ३३,९० | २७,८५ |
| ३३. मुदती ठेवी | ११,६० | ६,६४ |
| ३४. इतर शिलका | १९,९१ | १८,९९ |
| ३५. हातांतील रोख शिल्लक | २,३९ | २,२२ |
| ३६. एकूण | ४६२,०५ | ५४४,७४ |

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

### महाराष्ट्र बँकेची परळी वैजनाथ शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या मराठवाड्यांतील परळी वैजनाथ शाखेचें उद्घाटन दि. २४ जुलै रोजीं नगराध्यक्ष श्री. मेनकुदळे ह्यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं बँकेचे मॅनेजर श्री. जोग ह्यांनीं बँकेच्या धोरणाची व परंपरेची माहिती सांगितली व उपस्थितांचे आभार मानले. उद्घाटनसमारंभास स्थानिक व्यापारी, मर्चंट्स असोसिएशनचे सभासद व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. बँकेची मराठवाड्यांतील ही सातवी शाखा आहे.

---

**कापसासंबंधीं संशोधन**—मुंबई सरकारनें अमरावती येथें कापूस, ज्वारी व भुईमूग ह्या पदार्थांविषयीं संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रासाठी इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च १३ लाख रुपये खर्च करणार आहे. अशाच प्रकारचें एक केंद्र सुरत येथेंहि उघडण्यांत येणार आहे.

**अमरावती येथें सायकलींचा कारखाना**—अमरावती येथें सायकली तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याचें भांडवल १ कोटी रुपये राहील. बहुधा ह्या वर्षाच्या अखेरीस उत्पादनाला प्रारंभ करण्यांत येईल. कारखान्यांत दरमहा १,००० सायकली होतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**गरिबांना कायद्याची मदत**—गोआ येथील वकील लोकांनीं गरीब लोकांना कोर्टाच्या कामकाजांत मदत देण्यासाठी एक सोसायटी स्थापन केली आहे. सोसायटीनें ह्या कामासाठी २० वकीलांची एक कमिटी स्थापन केली आहे. कोर्टाच्या कामकाजाचा खर्च कमीं करण्याचा एक उद्देश सोसायटीनें ठेवला आहे.

**बोनसच्या रकमेंतून शाळेसाठी इमारत**—बेलापूर शुगर मिलसच्या कामगारवर्गानें आपल्या बोनसच्या रकमेंतून वर्गणी देऊन प्राथमिक शाळेसाठी इमारत बांधली आहे. इमारतीसाठी ४४,००० रुपये खर्च झाले शाळा झाल्यामुळें कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची आतां चांगली सोय होईल. शाळेचें उद्घाटन श्री. पु. ह. पटवर्धन ह्यांनीं केलें.

**नदीच्या पाण्याचें वांटप**—अफगाणिस्थानचे सरकार व रशिआ ह्यांच्यांत 'अमु दार्या' नदीचें पाणी उभयतां देशांनीं कसें व किती घ्यावे ह्या बाबतींत करार झाला आहे. करारामाणें पाण्याचें वांटप करण्यासाठी जरूर त्या बांधकामाची प्राथमिक तयारी करण्यांत येत आहे.

**जर्मन शास्त्रज्ञांना अधिक वेतन**—पश्चिम जर्मनींतील जर्मन शास्त्रज्ञ रशिआंत काम करण्यास तयार असतील तर त्यांना कारखानदारांकडून सध्या जितकें वेतन मिळतें त्यापेक्षा अधिक वेतन देण्याची तयारी रशिआचे पंतप्रधान श्री. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं दाखविली आहे.


## ✻ सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. ✻

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ टेलिफोन २७०९४

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | :: | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | :: | :: | रु. ७,९७,८४० |
| रिझर्व्ह फंड | :: | :: | रु. ८,३४,७०० |
| ठेवी | :: | :: | रु. १,७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | :: | :: | रु. १,९९,६९,००० |

बँकेच्या शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव, मुंबई ४.






## कापसाच्या उत्पादनांत वाढ

कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत आणि उत्पादनांत १९५७-५८ मध्यें त्यामागील वर्षापेक्षा वाढ झाली आहे.

भारतांत १९५७-५८ मध्यें या पिकाची २,०१,५८,००० एकर विभागांत लागवड झाली असून त्यापासून प्रत्येकी ३९२ रत्तलांच्या ४७,५३,००० गांसड्या कापूस मिळेल असें मध्यवर्ती अन्न आणि शेतकी खात्याच्या अर्थ आणि आंकडेवारी विभागानें या पिकाच्या अ. भा. अंतिम अंदाजांत दिलेल्या आंकड्यावरून दिसून येतें. १९५६-५७ मधील किंचित् दुरुस्त केलेल्या अंदाजांतील लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन यांचे हेच आंकडे अनुक्रमें १,९८,९३,००० एकर व ४७,३५,००० गांसड्या असे होते. यावरून १९५६-५७ पेक्षा १९५७-५८ मध्यें लागवडीच्या क्षेत्रांत २,६५००० एकरांनीं किंवा १·३ टक्क्यानें व उत्पादनांत १८,००० गांसड्यांनीं किंवा ०·४ टक्क्यानें वाढ झाल्याचें दिसून येईल.

मुंबई, पंजाब, आणि मध्यप्रदेश या राज्यांत या पिकाच्या लागवडीच्या क्षेत्रांत विशेष वाढ झाली असून पेरणीच्या वेळीं अनुकूल असलेलें हवामान त्यास कारणीभूत आहे. म्हैसूर आणि आंध्रप्रदेश या राज्यांत या पिकाच्या लागवडीच्या क्षेत्रांत घट झाली.

राजस्थान, मद्रास आणि पंजाब या राज्यांत या पिकाच्या उत्पादनांत विशेष वाढ झाली असून हें पीक वाढण्याच्या वेळेस असलेलें अनुकूल हवामान त्यास कारणीभूत आहे. मध्यप्रदेश आणि मुंबई या राज्यांतील कापसाच्या उत्पादनांत घट झाली.

सन १९५७-५८ मध्यें १६,६४,००० टन सरकीचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. १९५६-५७ मधील किंचित् दुरुस्त केलेल्या अंदाजांतील हाच आंकडा १६,५७,००० टन होता. यावरून १९५६-५७ पेक्षां १९५७-५८ मध्यें सरकीच्या उत्पादनांत ७,००० टनांनीं किंवा ०·४ टक्क्यानें वाढ झाल्याचें दिसून येईल.

---

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

( आंकडे लक्ष रु. चे )

| | ११ जुलै १९५८ रु. | ४ जुलै १९५८ रु. | १२ जुलै १९५७ रु. |
|---|---|---|---|
| भारतांतील 'डिमांड' देणीं | ७५४,४५ | ७४९,२७ | ७१,५५० |
| भारतांतील 'टाइम' देणीं | ८१४,९३ | ८१२,५९ | ५६०,०१ |
| रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं कर्जें* | ११,६४ | १३,४० | ५१,२९ |
| | (१०,८६) | (१२,२७) | (४५,२९) |
| भारतांतील रोख शिल्लक | ३९,५२ | ४२,७० | ४१,४२ |
| रिझर्व्ह बँकेजवळील शिलका | ९५,६७ | ८८,२३ | ७४,८१ |
| इतर बँकांत चालू खात्यावर | १३,५३ | १५,१४ | १०,१७ |
| कॉल मनी व शॉर्ट नोटीस मनी | ५८,४३ | ५५,४९ | २२,२३ |
| सरकारी रोख्यांतील गुंतवणूक | ५०३,०५ | ४९९,६८ | ३३२,२० |
| कर्जें | ७६५,७९ | ७७०,२० | ७२६,३६ |
| खरिदलेलीं व डिस्कौंट केलेलीं इनलंड बिलें | ९२,९३ | ९६,८१ | १२२,४६ |
| खरिदलेलीं व डिस्कौंट केलेलीं विदेशीं बिलें | ३५,२२ | ३४,९२ | ५५,११ |

*कंसांतील आंकडे बिल मार्केट योजनेखालील कर्जें दर्शवितात.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

स्थापना सन १९३५ — टे. नं. ३६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,००० हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० „ |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० „ |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. वा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे „
श्री. आ. पां. ढोर „
श्री. ज्ञा. मा. मनसुख „
श्री. म. रा. नेहरकर „

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.